# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र. ३९-२२ दिनांक ०४/०२/२०२२

## मंदिराच्या दानपेटया फोडुन पैश्यांची चोरी करणा-या सराईत आरोपीतांस अटक करुन ४ गुन्हे उघडकीस

दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ते दिनांक ३१/०१/२०२२ रोजी रोजीच्या रात्री पियुषपाणी जैन मंदिर, वर्सोवागांव ता. जि.ठाणे येथील मंदिरात ठेवलेल्या दानपेटया फोडुन त्यातील अंदाजे ५०,०००/- रुपये रक्कम कोणीतरी अज्ञात इसमाने कोणाचेही संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी केल्याबाबत फिर्यादी हरीष रतीलाल सलोत वय ६८ वर्ष रा. वखरीया हाऊस, एन.एस.रोड नंबर ०९, जुहू स्किम मुबंई - ४९ यांनी दिलेल्या तक्रारी वरुन काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ५१/२०२२ कलम ३८०, ४५७, ४५४ अन्वये दिनांक ३१/०१/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

काशिमीरा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि/प्रशांत गांगुर्डे व त्यांचे स्टाफने नमुद गुन्हयांचे घटनास्थळापासुन ते आरोपीत पळुन गेलेल्या मार्गावरचे सुमारे १०० ते ११० सी.सी.टि.व्ही. फुटेजची बारकाईने तपासणी व तांत्रीक विश्लेशन करुन त्या आधारे भिवंडी, मालवणी व वडाळा मुबंई येथुन मंदिराची दानपेटी फोडणारे आरोपीत १) समसुद्दा कुरेशी वय ३० वर्ष रा. खाडीपार, ता.भिवंडी जि. ठाणे. मुळ रा.आयोध्या, उत्तरप्रदेश २) सईद खान वय ४२ वर्ष रा.एस-३७ अंबोजवाडी आझादनगर, मालवणी गेट नंबर ८ मालाड (प) मुबंई. मुळ रा.गोंडा,ऊत्तरप्रदेश ३) इम्रान शेख वय २२ वर्ष रा. सॉल्ट पेन रोड, वडाळा (पुर्व) मुबंई. मुळ रा. प्रतापगढ, उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेऊन कसोशीने तपास केला असता नमुद आरोपीतांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. नमुद आरोपीतांकडे केलेल्या अधिक तपास करता नमुद आरोपीतांनी खालील इतर ३ गुन्हयांची कबुली दिली आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | काशिमीरा | ५१/२०२२ भारतीय दंड संहीता कलम ४५४,४५७,३८०, ३४ |
| २. | काशिमीरा | ८५६/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ४५७,३८०,३४ |
| ३. | विरार | १३२१/२१ भारतीय दंड संहीता कलम ३८०,४५७,४५४ |
| ४. | वालीव | १४५२/२१ भारतीय दंड संहीता कलम ३८०,४५७,४५४ |

नमुद आरोपीतांना दिनांक ०३/०२/२०२२ रोजी अटक केलेली आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदरची कामगीरी श्री अमित काळे पोलीस उपआयुक्त परीमंडळ-०१, श्री विलास सानप सहाय्यक पोलीस आयुक्त मिरारोड विभाग, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.निरी/श्री संजय हजारे, पोनि/श्री विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी/श्री प्रशांत गांगुर्डे, सहा.फौज./प्रकाश कावरे, पो.ना.विश्वनाथ जरग, सचिन हुले, पो.शि. हनुमंत तेरवे, समीर यादव, सुधीरखोत, अनिल नागरे, सनी सुर्यवशी सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.

---ooo---